दैनिक लोकमत वाचकांच्या पहिल्या पसंतीचे मराठी राष्ट्रीय दैनिक

ार, दि. २ ऑगस्ट २००५ पृष्ठे १२+६, किंमत- रु. २.०० औरंगाबा

# जुनाट रोगांसाठी होमिओपॅथिक उपचार

औरंगाबाद- संशोधकांच्या अविरत प्रयत्नांमुळे वैद्यकीय क्षेत्रातही नवनवीन औषधोपचारांची भर पडत आहे. तरीदेखील रोगांची व रुग्णांची संख्या कमी झालेली नाही. त्यापैकी काही रोगांवर अजूनही खात्रीलायक इलाज नाही. बरेचसे रुग्ण अशा दुर्धर रोगांसोबत नाइलाजाने जगत असतात. अशा वेळेस एखाद्या डॉक्टरकडून, एखाद्या उपचारपद्धतीमुळे रुग्णाला मिळालेला दिलासा रुग्ण व त्याच्या आप्तांसाठी अमूल्य ठरतो. नुकताच सौ. विजयालक्ष्मी जाधव यांना होमिओपॅथिक उपचाराचा आलेला अनुभव असाच आनंददायी व आशाजनक आहे.

सौ. जाधव यांचं वय सध्या ६२ वर्षे आहे. १०-१२ वर्षांपासून त्या किडनीच्या आजारामुळे त्रस्त आहेत. स्वतःचा मुलगा, मुलगी, जावई असे सगळे घरचे एम.डी. डॉक्टर्स असल्यामुळे त्यांना उत्तम वैद्यकीय उपचार देण्यात आले; परंतु कालांतराने किडन्या खराबच होत गेल्या. आता डायलेसिसशिवाय पर्याय नसल्याचे त्यांना सुचविण्यात आले. सौ. जाधव मात्र यास तयार नव्हत्या. जवळच्या एका नातेवाइकाचे डायलेसिस आणि किडनीरोपणामध्ये होणारे हाल बघितल्यामुळे त्यांची डायलेसिस व किडनीरोपण करण्याची अजिबात इच्छा नव्हती. एकूण त्यांची शारीरिक अवस्था फार नाजूक बनली होती. संपूर्ण विश्रांतीसाठी त्या अंथरूणाला खिळलेल्या होत्या. दिनक्रम विस्कळीत झाला होता. अशावेळी त्यांना पिंपरी, पुणे येथील डॉ. अमरसिंह निकम या नामवंत होमिओपॅथिक डॉक्टरांबद्दल कळाले. सौ. जाधव यांनी डॉ. निकम यांच्याकडे औषधोपचार सुरू केले व त्यांना बराच फायदा झाला. तब्येतीत लक्षणीय सुधारणा झाली. दैनंदिन जीवनक्रम सुरू करता आला. शारीरिक क्लेष कमी झाले. परत एकदा सामान्य आणि दीर्घायुष्य जगण्याची आशा पल्लवित झाली.

ही लक्षणीय सुधारणा घडून आली डॉ. अमरसिंह निकम यांच्या होमिओपॅथीतील परमोच्च कुशलतेमुळे. वीस वर्षांपासून ते पिंपरी येथे प्रॅक्टिस करीत आहेत.

डॉ. निकम यांचे खास वैशिष्ट्य म्हणजे ते चालवीत असलेले ५० खाटांचे होमिओपॅथिक हॉस्पिटल हे खाजगी क्षेत्रातील अशा प्रकारचे पहिले हॉस्पिटल आहे. दैनंदिन सर्व रुग्णांसाठी तसेच तात्काळ सेवांसाठी आवश्यक त्या सर्व अद्ययावत सुविधांनी हे हॉस्पिटल सज्ज आहे. आपत्कालीन रुग्णांसाठी स्वतःच्या २ ॲम्ब्युलन्ससुद्धा हॉस्पिटलकडे आहेत.

हृदयरोग, दमा, सांधेदुखी, किडनीचे आजार व इतर अनेक प्रकारच्या रोगांवर डॉ. निकम उपचार करतात. डॉक्टरांच्या या क्षेत्रातील दीर्घ अनुभव, त्यांची हातोटी, विद्वता यामुळे त्यांचा लौकिक दूरवर पसरला आहे. रुग्णांच्या संख्येत उत्तरोत्तर भर पडत आहे. अनेक वेळा रुग्ण तपासणी पहाटे ३-४ वाजेपर्यंत चालूच राहते. रात्रंदिवस अविरत श्रम, झोपेला तिलांजली व यामुळे विस्कळीत होणारे खाजगी जीवन... पण डॉ. निकम यांना याचा अजिबात पश्चात्ताप नाही. 'माझे रुग्णच मला रात्र-रात्र जागायची ताकद देतात', असं विनम्रतेने म्हणण्यात डॉक्टरांची त्यांच्या कामावरील असीम निष्ठा झळकते.

वरीलबाबतीत विस्तृत माहिती हवी असलेल्या व्यक्तींनी खालील ठिकाणी संपर्क साधावा. (१) लोकमत हेल्पलाईन, लोकमत भवन, औरंगाबाद, (२) आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल, उपचार केंद्र, पिंपरी, पुणे, फोन- ०२०-२७४१२५४९.

लोकमत हेल्पलाईन